| | |
|---|---|
| MHK0110004972023 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. ७१/२०२३ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्रमांक २५ खालील आदेश</u>**<br>**<u>संगीता काकासो माने</u>**<br>**<u>विरुध्द</u>**<br>**<u>प्रशांत धोंडीराम पाटील वगैरे</u>** |

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर वादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, सदर कामी काही महत्वाची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरील कागदपत्रे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने न्यायालयाच्या कामी हजर करून घेणे महत्वाचे असलेने प्रतिवादींनी सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून न्यायाच्या दृष्टीने योग्य तो आदेश करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादी यांनी सदर दावा हा कायम मनाई ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात अदयाप मुद्दे काढलेले नसून प्रकरण नि. ५ च्या युक्तीवादाकरिता प्रलंबित आहे. प्रतिवादीने सदरच्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार केला असता सदरील कागदपत्रे दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. पुराव्याच्या वेळी वादीला सदर कागदपत्रांवर उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. म्हणून सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. अर्ज अशंत:मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

स्वाक्षरी/–

**दिनांकः– ०६/१२/२०२५** **( आर. एस. मोरे )**
**पेठवडगाव** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पेठवडगाव**